बेलीफमार्फत

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

-: निविदा / दरपत्रक सुचना :-

दिनांक : १८/०८/२०२६

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील मुख्यालयामध्ये कार्यरत न्यायालये व आस्थपनेकरीता पुढील नमुद प्रिंटरसाठी नविन कॉम्पीटेबल टोनर कार्टेजबाबत स्थानिक पुरवठादारांकडून दरपत्रक / निविदा मागविण्यात येत आहे.

Sr. No.	Name of Article
1	Canon LBP246dw व ImageClass MF465dw प्रिंटर करीता Compatiable Toner Cartidge

करीता स्थानिक पुरवठादार / विक्रेते यांना कळविण्यात येत आहे की, ज्यांना उपरोक्त नमुद प्रिंटर करीता कार्टेज पुरवाठा वार्षिक सेवा-करार करावयाचा आहे. त्यांनी सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दिनांक २४/०८/२०२६ चे सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत खालील नमुद अटी / शर्तीच्या अधिन राहून दरपत्रक / निविदा बंद लिफाफ्यामध्ये सादर कराव्यात.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>अटी व शर्ती</th></tr>
<tr><td>१</td><td>मोहरबंद लिफाफ्यामध्ये 'Canon LBP246dw व ImageClass MF465dw प्रिंटर करीता Compatiable Toner Cartidge साठी वार्षिक करार करणेबाबत दरपत्रक' असा ठळक अक्षरामध्ये उल्लेख करण्यात यावा. तसेच निविदा/दरपत्रक खालील नमुण्यामध्ये सादर करण्यात यावा.
<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Name of Article</th><th>Qty.</th><th>Rate</th><th>Applicable GST/CGST Rate</th><th>Total Amount (4+5)</th></tr>
<tr><td>1</td><td>Canon LBP246dw व ImageClass MF465dw प्रिंटर करीता Compatiable Toner Cartidge</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>२</td><td>दरपत्रकातील / निविदेमधील दर हे करांसहीत तसेच बसवून देणेसह आणि पडताळणीसह नमुद करावे. सदरील दर हे दरपत्रक स्विकारल्यावर ०१ वर्षासाठी अस्तित्वात राहतील.</td></tr>
<tr><td>३</td><td>प्रिंटर टोन कार्टेजची मागणी केल्यानंतर पुरवठाधारकाने पुर्वी जे टोनर प्रिंटरमध्ये बसविले होते तु जुने टोनर पुरवठाधार परत नेवू शकतील. त्यामुळे दरपत्रकात दर नमुद करतांना सदरील बाबींचा विचार करूनच कमीत कमी दर आकारून दरपत्रक / निविदा सादर करावीत.</td></tr>
<tr><td>४</td><td>ज्यावेळेस प्रिंटर टोनर कार्टेजची मागणी करण्यात येईल त्यावेळेस सील असलेले पिंटर टोनर कार्टेजच स्विकारण्यात येतील. रिफीलींग केलेले कार्टेज स्विकारण्यात येणार नाही.</td></tr>
<tr><td>५</td><td>दर करार केल्यानंतर प्रिंटर टोनर कार्टेज उपलब्ध करून देण्याची संपुर्ण जबाबदारी संस्थेवर / पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल. तसेच सदर कालावधीत पुरवठादारास सदर साहित्याबाबत कोणताही जास्तीचा दर आकारता येणार नाही.</td></tr>
<tr><td>६</td><td>ज्या न्यायालया/विभागामध्ये प्रिंटर बसविण्यात आलेले आहेत. त्या ठिकाणी Service Call Report तयार करून त्यावर संबंधीत न्यायालय/विभागातील कर्मचा-याची स्वाक्षरी घेवून त्याची एक प्रत संबंधीत जिल्हा न्यायालय येथे देण्यात यावी व एक प्रत पुरवठाधारक यांनी हस्तगत करावी. जिल्हा न्यायालयात देयक सादर करतांना याबाबतचा तपशील देयका सोबत सादर करावा लागेल.</td></tr>
</table>

७	सदर करारापोटी होणा-या रक्कमेची अदायगी एका वर्षात चार हप्त्यात म्हणजेच तिमाही स्वरूपात अदा करण्यात येईल. तसेच प्रशासकीय कारणास्तव विलंब होत असल्यास विलंब आकार, व्याज किंवा इतर अतिरिक्त शुल्क देय राहणार नाही.
८	प्रिंटरचे बसविण्यात येणारे कॉम्पीटेबल टोनर कार्टेज हे दर्जेदार व उच्च प्रतीचे राहील, सदरील टोनरमध्ये समाविष्ट असलेली शाई/पावडर हे उच्च प्रतीची असणे आवश्यक आहे.
९	कोणतेही दरपत्रके / निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके / निविदा नाकारण्याचा हक्क जिल्हा न्यायालय, वर्धा राखून ठेवीत आहे.
१०	प्रत्येक पुरवठाधारकाने फकत एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.
११	टोनरची मागणी नोंदविल्यानंतर २४ तासाच्या आत पुरवठाधारकास मुख्यालयातील न्यायालये / विभागाचे ठिकाणी टोनर कार्टेज उपलब्ध करून दयावे लागेल. त्याकरीता कोणताही भत्ता किंवा वाहन जिल्हा न्यायालयाद्वारे पुरविण्यात येणार नाही.
१२	बदलण्यात आलेल्या टोनर कार्टेजमध्ये दोष आढळून आल्यास / काही दोष उत्पन्न झाल्यास तो तात्काळ बदलून दयावा लागेल.
१३	सदरील कराराचे पालन न केल्यास कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी अथवा करार संपुष्टात आणण्याचे अधिकार जिल्हा न्यायालय, वर्धा यांनी राखून ठेवलेले आहे.
१४	वार्षिक देखभाल / दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे करार जसे की, GST, Income Tax etc. दरपत्रक मंजूर झालेल्या संबंधीत व्यावसायिकाला / सेवापुरवठादाराला सोसावे लागतील. या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतही कर संबंधीतांस अदा करण्यात येणार नाही.
१५	टोनरचा पुरवाठ केल्यानंतर पेपरवरील पिंटींग पुसल्या जात असल्याचे निर्दशनांस आल्यास ते प्रिंटर टोनर कार्टेज स्विकारण्यात येणार नाही. व ते बदलून देण्याची सर्वस्वी जबाबदारी टोनर पुरवठाधारकावर राहील तसेच पुन्हा तोच टोनर पुरवठा केल्यास त्याचा मोबदला देण्यात येणार नाही.
१६	सर्व टोनर मध्ये शाई / पावडर हे १०० टकके पूर्ण क्षमतेने भरलेले असावेत टोनरचे प्रमाण कमी भरल्याचे आढळून आल्यास किंवा टोनर खराब निघाल्यास ते टोनर परत बदलवून नविन दयावे लागेल. बदलविण्यात आलेल्या टोनरचा वेगळा मोबदला देण्यात येणार नाही.
१७	टोनर पुरवठा करण्याबाबत तक्रारी आल्यास मंजुर करण्यात आलेले कंत्राट कोणतीही नोटीस न देता तात्काळ रद्द करण्यात येईल.
१८	करारानुसार काम न केल्यास किंवा अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता आपला वार्षिक विषयांकीत करार संपूर्णतः रद्द करण्याचे अधिकार जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांना राहील.
१९	दरपत्रक / निविदेसोबत आस्थापना व दुकाने अधिनियम लायसन्स प्रमाणपत्राची प्रत, पॅनकार्डची प्रत, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्रे इत्यादी कागदपत्रे न चुकता सादर करावीत.
२०	सदरची जाहिरात जिल्हा व सत्र न्यायालय, चे अधिकृत संकेतस्थळ https://wardha.dcourts.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल.
२१.	निविदा/दरपत्रकधारकाने त्यांच्या निविदा जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या कार्यालयाकडे दिनांक २४/०८/२०२६ रोजीचे सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केल्या जाणार नाही.

स्वा/-
(हेमंत भ. गायकवाड)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा.

वर्धा
दिनांक : १८/०८/२०२६

पृष्ठांकन क्र. ४०१६ /२०२६.
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
दिनांक : १८/०८/२०२६.

प्रतीलीपी माहीतीस व योग्य कार्यवाहीस सादर :

१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) जिल्हा परीषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
७) सहाय्यक अधिक्षक, संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

वर्धा
दिनांक : १८/०८/२०२६

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.